




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०२ ● अंक : १५८ ● पुणे ● सोमवार, दि. ०५ मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





पहलगाम घटनेचा राजगुरूनगर मुस्लिम बांधवाकडून निषेध **3**





कचऱ्यातून फुलवले सुंदर व हिरवेगार टेरेस गार्डन **4**


# हास्ययोग चळवळ समाजाला सकारात्मक, सुदृढ बनवतेय

## चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन; नवचैतन्य हास्ययोग परिवारातर्फे जागतिक हास्ययोग दिन साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"नवचैतन्य हास्ययोग परिवार ही समाज सकारात्मक करणारी आरोग्याची चळवळ आहे. शारीरिक आरोग्याबरोबरच हास्यामुळे मानसिक आरोग्य चांगले राहते. जगामध्ये आज १२० देशात जागतिक हास्यदिन साजरा होत आहे. हास्यामुळे सकारात्मकता येते. सकारात्मक विचारांची माणसे समाजात चांगला बदल घडवतात. मनाने प्रसन्न असणारी माणसे दुसऱ्यांचे दुःख दूर करण्यासाठी मदत करतात. म्हणूनच ज्येष्ठांबरोबरच तरुण माणसेही या पद्धतीचा उपयोग करत आहेत," असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



जागतिक हास्ययोग दिनानिमित्त नवचैतन्य हास्ययोग परिवारातर्फे बालगंधर्व रंगमंदिरात आयोजिलेल्या विशेष हास्ययोग कार्यक्रमात चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांचे 'आनंदाच्या वाटा' या विषयावर व्याख्यान झाले. प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश महामंत्री राजेश पांडे, जयराज ग्रुपचे राजेश शहा, प्रसिद्ध व्यावसायिक प्रकाश धोका, पितांबरी प्रोडक्ट्सचे महेश जोशी, किरण दगडे पाटील, नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक विठ्ठल काटे व सुमन काटे (व्हर्च्युअली), हास्ययोग परिवाराचे मुख्य समन्वयक मकरंद टिल्लू, उपाध्यक्ष विजय भोसले, सचिव पोपटलाल शिंगवी, खजिनदार ॲड. रामचंद्र राऊत, विश्वस्त जयंत दशपुत्रे, प्रमोद ढेपे, दत्तात्रय कुंदेन, ॲड. एकनाथ सुगावकर, सुनील देशपांडे, अतुल सलाग्रे, हरीश पाठक आदी उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "जीवन सकारात्मक असेल, तर शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते. आनंदी व सुदृढ समाजासाठी ही चळवळ मोलाचे योगदान देत आहे. ताणतणावापासून दूर राहण्यास हास्ययोगाचा उपयोग होतो. एखाद्या चिकित्सेप्रमाणे आज हास्ययोग काम करत असून, जागतिक स्तरावर याला मान्यता आहे. विठ्ठल काटे, मकरंद टिल्लू यांच्या पुढाकाराने एक लाख लोकांपर्यंत ही चळवळ पोहोचणार, यात काही शंका नाही. पुण्यात सुरु झालेली ही चळवळ नागपुरातही सुरु व्हावी."

'आनंद वाटा'वर विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. संजय कळमकर म्हणाले, "आपण जीवन जगताना आनंदातही चुका शोधत बसतो. तसे न चुकांमध्येही आनंद शोधण्याची सवय लावून घ्यायला हवी. सकारात्मक वृत्तीने आनंदाचा शोध घेत वाटचाल करत राहिलो, तर जीवन अधिक आनंदी होते. हास्ययोग ही सकारात्मक जीवन जगण्यासाठीची संजीवनी आहे."

राजेश शहा यांनी हास्ययोग समाजात सकारात्मकता पेरत असल्याचे सांगितले. आगामी काळात एच. व्ही. देसाई हॉस्पिटलच्या माध्यमातून पुण्याला मोतीबिंदू मुक्त करण्याचा उपक्रम राबवणार आहोत. अधिकाधिक नागरिकांनी डोळ्यांची तपासणी करून घ्यावी. देसाई रुग्णालयात मोफत डोळ्यांची शस्त्रक्रिया करण्यात येईल, असे शहा यांनी नमूद केले.

गेल्या २८ वर्षांपासून नियमित हास्ययोग करत असल्याने आजवर कोणताही आजार झाला नाही. त्यामुळे हास्ययोग खूप महत्वाचा असल्याचे प्रकाश धोका म्हणाले. महेश जोशी यांनी हास्ययोग चळवळ अधिक व्यापक व्हावी. ती घराघरात पोहोचावी. सध्याच्या धकाधकीच्या काळात लोकांच्या चेहऱ्यावर हसू परत आणण्याचे काम ही चळवळ करत असल्याचे ते म्हणाले.

मकरंद टिल्लू म्हणाले, "जगामध्ये हास्य क्लब ही चळवळ सुरू होण्याचे हे तिसावे वर्ष आहे. नवचैतन्य हास्ययोग परिवार २३५ शाखांच्या माध्यमातून २५ हजार लोकांना रोज हास्ययोग करायला लावते. एक लाख लोकांना या हास्य चळवळीत जोडून घेण्याचे उद्दिष्ट्य आहे."

यानिमित्ताने हास्ययोगाचे प्रकार, मनोगते, मान्यवरांचे सत्कार झाले. बालगंधर्व रंगमंदिर खचाखच भरून गेले होते. उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग घेत हास्ययोग केला. विजय भोसले यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. हर्षदा टिल्लू यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. एकनाथ सुगावकर यांनी आभार मानले.

## ठळक बातम्या

### शिरूरच्या सरदवाडीत फॉर्च्युनरचा अपघात

शिरूर (आरंभ पर्व): अहिल्यानगर रस्त्यावर सरदवाडी (ता. शिरूर) येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव फॉर्च्युनर मोटार रस्ता दूभाजकाला धडकून थेट रस्त्याकडेच्या एका गाळ्यात घुसली. आज पहाटे साडेचार च्या सुमारास हा विचित्र अपघात झाला. सरदवाडी हे कायम वर्दळीचे व वाहनांच्या गर्दीचे गाव आहे. मात्र पहाटेच्या वेळेस रस्त्यावर कुणीही नसल्याने दूर्घटना टळली. गाळादेखील मोकळाच असल्याने सुदैवाने या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. मात्र गाळ्याचे शटर आणि भिंतींचे मोठे नूकसान झाले. सरदवाडी येथे काही दिवसांपूर्वी रस्त्यावरील गतिरोधकांवर आदळून एक कंटेनरही रस्त्याकडेच्या एका इमारतीला जावून धडकला होता. त्यावेळी सुदैवाने कुणालाही इजा झाली नाही. आज पहाटेच्या प्रकारात शिरूरहून पुण्याच्या दिशेने जाणारी भरधाव फॉर्च्युनर (क्र. एमएच १२ टीके ८२३२) थेट एका गाळ्यात घुसल्याने गाळामालक आशिष सरोदे यांच्या गाळ्याचे मोठे नूकसान झाले. पुण्याला जात असलेली फॉर्च्युनर रस्ता दूभाजकाला धडकल्याने चालकाचे नियंत्रण सुटले व ती थेट गाळ्यात शिरली, असे त्यांनी सांगितले.

### दौंड शहरातून ८५० किलो गोमांस जप्त

दौंड (आरंभ पर्व) : दौंड शहरात पोलिसांनी केलेल्या कारवाईत ८५० किलो गोमांस जप्त करून दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोहत्या करणार्यांकडून घरासमोर राहणार्या व्यक्तीच्या घरात गोमांस टाकून पळ काढण्यात आल्याचा प्रकार या कारवाई दरम्यान समोर आला आहे. दौंड पोलिसांनी या बाबत माहिती दिली. शहरातील खाटीक गल्ली येथे गोहत्या सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली अंतर्गत असणार्या ११२ या क्रमांकावर पोलिसांना देण्यात आली होती. त्यानंतर दौंड पोलिसांचे एक पथक खाटीक गल्ली येथे दाखल झाले. गोहत्येची माहिती मिळताच मानद पशु कल्याण अधिकारी अहिरेश्वर जगताप व त्यांचे सहकारी देखील तेथे दाखल झाले. गोहत्या करणारे आलम शेख व अझीम शेख ( दोघे रा. खाटीक गल्ली, दौंड) यांनी त्यांच्या घरासमोर राहणारे दिलीप सखाराम कांबळे यांच्या घरात गोमांस टाकून पळ काढला होता. पोलिस पथकास दिलीप कांबळे यांच्या घराची पाहणी करत असताना त्यांना आलम शेख याच्या घरात देखील गोमांस असल्याचे आढळून आले.

### 'पुण्यश्री कॅन्टीन'चे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : जिल्हा परिषदेच्या जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली हवेली पंचायत समितीने महिला बचत गटाच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या 'पुण्यश्री कॅन्टीन आणि सुपर मार्केट'चे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत हवेली पंचायत समितीच्या आवारात हे कॅन्टीन सुरू करण्यात आले आहे.

# पुरंदरमधील गावांमध्ये तणावपूर्ण शांतता



**जेजुरी (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळासाठी जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करण्यासाठी एखतपूर येथे गेलेल्या अधिकारी व पोलिसांबरोबर आंदोलकांची धुमश्चक्री झाली होती. या पार्श्वभूमीवर विमानतळासाठी भूसंपादन होणाऱ्या गावांमध्ये रविवारी तणावपूर्ण शांततेचे वातावरण होते. दरम्यान, आंदोलकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये प्रस्तावित विमानतळासाठी जमिनीचे ड्रोन सर्वेक्षण करण्याचे काम शासकीय यंत्रणांनी सुरू केले होते. यासाठी एखतपूर येथे शनिवारी अधिकारी व पोलीस गेले होते. त्यावेळी आंदोलकांनी शासकीय अधिकाऱ्यांचा रस्ता अडविला. यानंतर पोलीस आणि आंदोलकांमध्ये धुमश्चक्री झाली. पोलिसांच्या गाड्यांवर आंदोलकांनी दगडफेक केली. पोलिसांनी अश्रूधुराचा मारा करून आंदोलकांवर लाठीमार केला. या लाठीमारामध्ये काही शेतकरी जखमी झाले तर, दगडफेकीत ३ पोलीस अधिकारी व १३ पोलीस अंमलदार जखमी झाले. सासवड पोलिसांनी चार आंदोलकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. त्यामुळे सासवड पोलीस ठाण्याच्या आवारात शनिवारी रात्री उशिरापर्यंत शेतकरी आंदोलकांनी ठिय्या मांडला होता.

अटक केलेल्या आंदोलकांना सोडा, अशी त्यांची मागणी होती. पोलिसांनी अटक केलेल्या आंदोलकांची न्यायालयाने पोलीस कोठडीत रवानगी केली.









# भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी

पहेलगाम हल्ल्यानंतर सर्वात पहिला परिणाम भारताकडून पाकिस्तानविरूद्ध कठोर पावले उचलण्यात झाला आणि त्यातही पहिला होता तो इंडस वॉटर ट्रीटी स्थगित करण्यात आला. हा करार दोन देशांतील पाणीवाटपाचा करार आहे आणि त्यामुळे पाकिस्तानच्या नाकातोंडात पाणी गेले आहे. हे साहजिक होते कारण पाकिस्तानच्या मांडीवर बसून भारतातील निरपराध लोकांच्या हत्या घडवणाऱ्या अतिरेक्यांना धडा शिकवणे गरजेचे होते आणि तेच मोदी सरकारने केले. मोदी सरकार म्हणजे नेहरू सरकार किंवा काँग्रेस नव्हे. मोदी सरकारने ताबडतोब पाकिस्तानचे पाणी बंद केले आणि पाक आता बोंबा मारत सुटला आहे. पण दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदूंच्या पर्यटकांच्या हत्या केल्या आणि त्यांची सुंता झाली आहे की नाही हे पाहिले अशा क्रूरकर्मा दहशतवाद्यांच्या बाबतीत इतकेच कठोर उपाय योजणे गरजेचे होते. तेच भारत सरकारने केले.

१९६० सालचा हा करार नेहरू सरकारमुळे भारताच्या माथी मारण्यात आला. यात पाकिस्तानचा सर्वंकष फायदा होता, पण तो आता स्थगित करण्यात आला आहे आणि त्यामुळेही पाकच्या नाकातोंडात पाणी गेले आहे. याबरोबरच पाकिस्तानला अनेक प्रकारे धडा शिकवण्यात येत आहे.भारताने पाकिस्तानकडील सर्व आयात बंद केली आहे. त्यामुळे अगोदरच कंगाल झालेला पाकिस्तान आणखी कंगाल होण्याच्या बेतात आहे. त्यातच आज एक आणखी बातमी अशी आहे की पाकिस्तानची एअर लाईन्स संकटात गटांगळ्या खात आहे. कारण भारताने आपल्या हवाई हद्दी वापरण्यास बंदी केली आहे. पाकिस्ताननेही भारतीय विमान कंपन्यांना त्यांची हवाई हद्द वापरण्यास मनाई केली आहे. पण भारताचे त्यामुळे नुकसान होणार नाही, तर पाकिस्तानसाठी हा कुठाराघात ठरणार आहे. त्याशिवाय भारताच्या दबावामुळेच पाकिस्तानला होणारी आर्थिक मदत आता ठप्प होणार आहे. मोदी सरकारने पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्धार पक्का केला आहे आणि त्याचे पहिले प्रत्यंतर आले आहे. पाकिस्तानच्या शेतकऱ्यांनी आमचे पाणी बंद केल्यामुळे आम्ही उपाशी मरणार आहोत असा कांगावा करण्यास सुरुवात केली आहे. पण ती वस्तुस्थिती असली तरीही हिंदू पर्यटकांना धर्म विचारून त्यांची हत्या करणाऱ्या नराधम दहशतवाद्याच्या कृत्याबद्दल पाकिस्तानी नागरिकांना शिक्षा होत असेल, तर त्याला कुणाचाच इलाज नाही. याबाबतीत शिवाजी राजांचे उदाहरण आठवते. त्यांनी त्यांच्याशी युद्ध करणाऱ्या इग्रजांच्या वतीने लढताना युनियन जॅक गर्वाने लहरवणाऱ्या इंग्रजांना असाच धडा शिकवला होता आणि इंग्रजांना मुश्कीलीत टाकले होते. तोच कित्ता मोदी यांनी गिरवला आहे. पाकिस्तान एअर लाईन्स संकटात आहे, तर पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून पाकिस्तानचा सिंधू जल करार स्थगित करण्यात आला आहे, तर पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि युरोपीय युनियन यांच्याकडून कर्ज मिळू नये म्हणून भारताने दबाव टाकला आहे. या सर्वांचा पाकला तोटा असा की त्याच्या आर्थिक नाड्या चांगल्याच आवळल्या गेल्या आहेत. यातून पाक कधीच सावरणार नाही हे निश्चित आहे.

भारताने पाकिस्तानविरोधात सर्जिकल स्ट्राईक केला आहे आणि त्यानुसार पाकिस्तानकडून संपूर्ण आयात बंद केले आहे. त्यामुळे पाकिस्तानचा श्वास गुदमरणार आहे. पाकिस्तानला आर्थिक आघाडीवर मोठा झटका बसणार आहे. विशेषज्ञांचे असे म्हणणे आहे की या निर्णयामुळे पाकिस्तानचे नुकसान प्रचंड होणार आहे. अगोदरच कर्ज, महागाई आणि बेरोजगार यांच्याशी लढत देणाऱ्या पाकिस्तानला या भारताच्या कठोर पावलामुळे जिणे अवघड होणार आहे. भारताच्या निर्णयामुळ पाकिस्तानची जनता दाण्यादाण्याला पारखी होणार आहे असे काहींचे म्हणणे आहे. पण आपण तितके वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. कारण पाकिस्ताननेच हे संकट ओढवून घेतले आहे. भारताने शनिवारी एका अधिसूचना जारी करून म्हटले आहे की एक नवीन तरतूद एफटीपी जोडण्यात आली आहे. त्यामुळे भारताकडून केल्या जाणाऱ्या आयातीवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यामुळे पाकचे कंबरडे मोडणार आहे आणि पाकला हीच शिक्षा योग्य आहे, भारताकडून पाकला जाणाऱ्या वस्तुंमध्ये कापूस, केमिकल्स आणि फूड प्रोडक्टस यांचा समावेश होतो. पण भारतावर आयात किंवा निर्यात बंद केल्याचा काहीच परिणाम होणार नाही. कारण भारताची अवस्था इतकी काही नाजूक नाही. उलट पाकची अवस्था दयनीय आहे आणि त्याला भरताच्या या कृतीचा फटका बसणार आहे. पहलगाम हल्ल्यानंतर आणि विशेषतः निरपराध हिंदू पर्यटकांना मारल्यानंतर भारताचा रूद्रावतार आता पाकला सहन करावा लागत आहे. त्यात भारताने पाकचे पाणी बंद केले आहे तसेच हवाई हद्द बंद केली आहे. पाकची डबघाईला आलेली अर्थव्यवस्था आणखीच गर्तेत गेली आहे आणि तसेच व्हावे अशी भारतवासीयांची इच्छा आहे. सिंधू जलकरार स्थगित केल्यानंतर आपल्याकडील काही लोक त्याला हलक्यात घेत आहेत, पण पाकिस्तानी जनता त्याचे भीषण परिणाम समजून चुकली आहे. जागतिक बँकेचा ताजा अहवाल असे सांगतो की २०२५ च्या शेवटपर्यंत पाकिस्तानचे ७४ टक्के लोक उपासमारीने मरू शकतात. पाण्याची कमतरता ही स्थिती आणखी बिघडवू शकते. पहलगाम हल्ल्यानंतर पाकची आधीच डळमळती अर्थव्यवस्था आणखीच कंगाल झाली आहे. आता जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याची शक्यता नाही, चीन-पाकला मदत करू शकणार नाही अशी स्थिती आहे, कारण चीनचे स्वतःचे प्रश्न आहेत. कर्ज, चलन फुगवटा आणि आंतरिक अस्थिरतेशी झुंजणाऱ्या पाकला नवे संकट पेलवणार नाही. पाकच्या जनजीवनावर त्याचा गंभीर परिणाम होणार आहे. युद्धसदृष्य परिस्थिती उद्भवते, तर पाकची अवस्था आणखीच अवघड होणार आहे. कारण आता युद्ध झाले तर पाकला ते परवडणार नाही. पहलगाम हल्ल्यानंतर भारताची स्थिती काही काळ चिंताजनक होती. पण पाक तर पुरता उद्ध्वस्त झाला आहे. पाक आपल्याच जाळ्यात गुंतला गेला आहे आणि त्याला कोणीही वाचवू शकणार नाही अशी स्थिती आहे.

# मनीषा लहारे यांना 'आई पुरस्कार' प्रदान

## उल्लेखनीय सामाजिक कार्यासाठी गौरव

**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

AR News च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात उल्लेखनीय सामाजिक कार्यासाठी 'मातृदिनानिमित्त आई सन्मान सोहळा पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. हा सन्मान यतीराज बहुउद्देशीय सामाजिक प्रतिष्ठाणच्या राज्य सचिव आणि शिक्षिका मा. मनीषा लहारे यांना त्यांच्या सातत्यपूर्ण, निस्वार्थ सामाजिक योगदानाबद्दल बहाल करण्यात आला.

अहिल्यानगर येथील व्ही स्टार हॉटेल येथे पार पडलेल्या या सोहळ्यात पुरस्काराचे वितरण भाजप महिला अध्यक्ष मा.सौ. नम्रताताई गौड, महिला मंडळ शिक्षण संस्थेच्या संचालिका मा.सौ.मीनलताई गंधे, कस्तुरबा फाउंडेशनच्या संचालिका मा.सौ.वैशालीताई नराल, तसेच AR News चॅनलच्या संपादिका मा. श्रुतीताई बत्तीन यांच्या हस्ते करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व स्मृतीचिन्ह असे होते.

समाजातील वंचित, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी केलेल्या कार्याची दखल घेत AR News संस्थेने हा पुरस्कार जाहीर केला होता. मनीषा लहारे यांनी महिलांचे सक्षमीकरण, बालविकास, शिक्षण क्षेत्रातील योगदान तसेच सामाजिक जनजागृतीसाठी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

पुरस्कार स्वीकारताना मनीषा लहारे म्हणाल्या, "हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नाही, तर माझ्या संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या समर्पित सेवाभावाचेही मूल्यांकन आहे. हा सन्मान आम्हाला पुढील कार्यासाठी नवे बळ देतो." कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, शिक्षक, पत्रकार, आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मनीषा लहारे यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# वार्ताहरांनी माहिती तात्काळ पाठवावी

## दै. 'आरंभ पर्व'तर्फे ओळखपत्र नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

### पुढील माहिती पाठवणे आवश्यक

- संपूर्ण नाव :
- कार्यरत तालुका/शहर :
- मोबाईल क्रमांक :
- पासपोर्ट साईज फोटो (नुकताच काढलेला, स्पष्ट प्रत) :
- ईमेल आयडी (असल्यास) :
- आधार क्रमांकाची छायांकित प्रत (ओळख पटविण्याकरिता) :
- दैनिक 'आरंभ पर्व'मध्ये कार्यरत असल्याचा कालावधी :
- रक्तगट :
- वरील माहिती पुढील अधिकृत माध्यमांवर पाठवावी.
- ई-मेल : aparvinfo@gmail.com
- व्हॉट्सअॅप क्रमांक : ७२७६३१४१४२

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दैनिक 'आरंभ पर्व'च्या कार्यक्षम आणि गतिमान वृत्तसेवेचा अविभाज्य भाग असलेल्या सर्व वार्ताहरांसाठी एक महत्त्वाची सूचना.

संपादकीय विभागातर्फे २०२५ सालासाठी नवीन ओळखपत्रे (ID Cards) तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेअंतर्गत राज्यातील व विविध जिल्ह्यांतील वार्ताहरांनी आपली माहिती सादर करणे अत्यावश्यक आहे.

### संपर्क साधावा

श्री. प्रतिक गंगणे
(व्यवस्थापकीय संपादक, पुणे)
७२७६३१४१४२

श्री. लक्ष्मण साबळे
(निवासी संपादक, पुणे)
८६०५२८४२७२

अभिषेक मरगळे
(मार्केटिंग हेड, पुणे)
९३५९४२१९०९

सदर माहिती सात दिवसांच्या आत पाठवावी. विलंब झाल्यास ओळखपत्र वितरणात अडथळा निर्माण होऊ शकतो, याची नोंद घ्यावी.

संपादीक सौ. सुरेखा सावंत-मते म्हणाल्या की, ही प्रक्रिया केवळ ओळखपत्र वितरणापुरती मर्यादित नसून, वार्ताहरांची अधिकृत नोंदणी, त्यांचे पत्रकारितेतील हक्क, व कार्यपद्धती अधिक ठोस व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. नवीन ओळखपत्रामुळे वार्ताहरांना वृत्त संकलनाच्या कामात अधिकृतता, सुलभता आणि विश्वासार्हता लाभेल.

# मोटारचालकासह चौघांना पोलीस कोठडी

- **वडगाव उड्डाणपूल अपघात प्रकरण**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील वडगाव उड्डाणपुलावर दुचाकीस्वार तरुणाला धडक देऊन त्याच्या मृत्यूस जबाबदार अससलेल्या मोटारचालकासह चौघांना न्यायालयाने ८ मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश रविवारी दिले. या प्रकरणातील मद्यधुंद मोटारचालकासह चौघांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा (भारतीय न्यायसंहिता कलम १०५) गुन्हा दाखल केला.

मोटारचालक शुभम राजेंद्र भोसले (वय २७), वेदांत इंद्रसिंग राजपूत (वय २८, दोघे रा. प्राधिकरण, निगडी), श्रेयस रामकृष्ण सोळंकी (वय २५, रा. मोरे वस्ती, पिंपरी-चिंचवड), निखिल मिलिंद रानवडे (वय २६, रा. औंध गाव) अशी पोलिस कोठडी रवानगी झालेल्यांची नावे आहेत. शनिवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास वडगाव उड्डाणपुलावर भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार कुणाल मनोज हुशार (वय २३, रा. चिंचवड) याचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी प्रज्योत दीपक पुजारी (वय २१, रा. चिंचवड) गंभीर जखमी झाला. कुणाल आणि प्रज्योत एका महाविद्यालयात शिक्षण घेत होते. याप्रकरणी मोटारचालक शुभम भोसले याच्यासह त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी चौघांना रविवारी न्यायालयात हजर केले. 'आरोपी आणि अपघातात मृत्युमुखी पडलेला दुचाकीस्वार कुणाल हे पिंपरी-चिंचवड शहरातील रहिवासी आहेत. आरोपी आणि त्यांच्यात काही वाद आहेत का, याद्दष्टीने तपास करायचा आहे. आरोपींची सखोल चौकशी करायची आहे, तसेच त्यांची डीएनए चाचणी करायची आहे. तपासासाठी पोलीस कोठडी द्यावी,' अशी विनंती सरकारी वकिलांनी केली.

# आंतरराष्ट्रीय रोमहर्षक टायटल्सची घोषणा!

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मे महिन्याचा आनंद लुटण्यासाठी तयार व्हा! ॲमेझॉनची मोफत सेवा असलेले ॲमेझॉन एमएक्स प्लेयर आता WAVES 2025 (वर्ल्ड ऑडिओ आणि व्हिज्युअल समिट) चा जलवा तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सज्ज आहे. त्यात त्यांच्या अत्यंत लोकप्रिय असलेल्या व्ही-देसी कॅटेलॉगमध्ये 20 पेक्षा जास्त जागतिक शीर्षके जोडण्याची घोषणाही करण्यात आली आहे. या यादीमध्ये बहुप्रतिक्षित कोरियन, मँडरिन आणि तुर्की ड्रामा तर आहेतच, पण त्याचबरोबर स्ट्रिमिंग सेवेसाठी पहिल्यांदाच ॲनिमे कॅटेगरीचाही समावेश करण्यात आला आहे. यामुळे कोरिअन, मँडरिन, तुर्की आणि आता जपानी भाषेतील 200 पेक्षा जास्त ॲनिमे शो असलेल्या लायब्ररीसह आंतरराष्ट्रीय मनोरंजन साहित्य डब केलेले सर्वात मोठे AVOD व्यासपीठ म्हणून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे स्थान अधिक मजबूत झाले आहे. ही लायब्ररी दर आठवड्याला वाढत आहे, जे हिंदी, तमिळ आणि तेलगूमध्ये स्ट्रीम करण्यासाठी उपलब्ध आहे.




या नव्याने जाहीर करण्यात आलेल्या व्यासपीठात 'फेक इट टिल यू मेक इट' हा हाय क्लास कॉर्पोरेट रोमांटिक शो, 'वेंड्रेलाज डायरी' या फिल-गुड स्टोरीटेलिंगपासून ते 'ख्रिसॅलिस' या तुर्की भाषेतील भावनिक ड्रामापर्यंत आणि 'फिश नोज यू' या फन फॅन्टसीपर्यंत विविध प्रकारच्या मनोरंजनाचे मिश्रण आहे. के- ड्रामाचे फॅन 'गॉस इलेक्ट्रॉनिक्स आणि प्राईड अँड प्रेज्युडाईस यासारख्या हिट्सची वाट पाहू शकतात, ज्यामध्ये रोमान्स, कॉमेडी, थरार असे सगळे आहे. आपल्या कंटेट ऑफरिंगचा आणखी विस्तार करत, ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने पहिल्यांदाच ॲनिमे सुरू केले आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या स्पाय X फॅमिली, डेमॉन स्लेयर, वन पंच मॅन, जोजोज बिझारे ॲडव्हेंचर आणि बऱ्याच शोंचा समावेश आहे. हे सर्व शोज हिंदीमध्ये डब करण्यात आले आहेत आणि भारतीय प्रेक्षकांसाठी मोफत उपलब्ध आहेत.

'वेव्हज (Waves-2025) 2025 मध्ये याचे जोरदार उद्घाटन करताना ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे संचालक आणि कंटेट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले की, "आम्ही आमच्या डब केलेल्या कंटेटचा विस्तार करतानाच, आमच्या नव्या ॲनिमे श्रेणीसह 20 पेक्षा जास्त नवे आंतरराष्ट्रीय शो तुमच्यासाठी आणताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. आमच्या प्रेक्षकांना काहीतरी नवीन बघण्याच्या रोमहर्षक पाहायला मिळण्याच्या दृष्टीने टाकण्यात आलेले हे महत्वाचे पाऊल आहे. आम्ही विशेष म्हणजेच प्रिमियम स्थानिक कंटेट मोफत देण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत, ज्यामुळे भारतातील जास्तीत जास्त प्रेक्षकांना जागतिक दर्जाचे मनोरंजन सहज उपलब्ध होईल आणि ते दर आठवड्याला त्याचा आनंद घेऊ शकतील."

# थोडक्यात



## महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा

डोंबिवली (आरंभ पर्व) : प्रजापीता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय डोंबिवली सेंटरच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन सेन्टर मध्ये मोठया उत्सहात साजरा करण्यात आला. या वेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळ बाबतीत माहिती देण्यात आली. जागतिक कामगार दिनानिमित्ताने नाक्यावरील पुरुष कामगार आणि महिला कामगारांना सन्मानित करण्यात आले या वेळी त्याना तुळस रोपटे शिवबाबा की प्रतिमा आणि फराळ देण्यात आला. या वेळी कामगारांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. समाजाचा कामगार हा एक महत्वाचा भाग असल्याचे सांगण्यात आले. या वेळी कामगारांना कलावती बेहन, संगीता बेहन, मनीषा बेहन, तेजा बेहन, यांनी मार्गदर्शन केले.




## राष्ट्रीय एमएसएमई समिट व लीडरशीप कॉन्क्लेव्ह ला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : पुणे इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम),पिरंगुट येथे आयोजित देशातील सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) समर्पित उद्दीपन 2025 या परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पीआयबीएम आणि एआयसीटीई यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या महत्त्वपूर्ण परिषदेत देशभरातील एमएसएमई क्षेत्रातील नोकरीच्या संधी जाणून घेण्यासाठी नॉलेज पार्टनर असलेल्या पीआयबीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटसह रमणबाईट प्रा.लि.यांनी तयार केलेले उद्दीपन हे मोबाईल ॲप्लिकेशन सादर करण्यात आले. एमएसएमई क्षेत्रातील रोजगाराचा चेहरा बदलण्यासाठी सज्ज असलेले हे पोर्टल रमणबाईट प्रा. लि.ने एआयसीटीईच्या सहकार्याने सुरू केले आहे. एमएसएमई क्षेत्राला अधिक सक्षम आणि प्रगतशील करण्यासाठी डिझाईन करण्यात आलेले उद्दीपन ॲपमुळे परिषदेत उद्योग क्षेत्रातील नेतृत्व,धोरणकर्ते,गुंतवणूकदार आणि सरकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनासह सहकार्य,नवोन्मेष आणि विकासासाठी एक गतिमान व्यासपीठ निर्माण झाले. उद्दिपन या एमएसएमई परिषदेला अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय शिक्षण व विकास राज्यमंत्री (उत्तरपूर्व) श्री.सुकांता मजूमदार, महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री श्री.उदय सामंत यांसह सन्माननीय अतिथी म्हणून एआयसीटीईचे अध्यक्ष प्रा.डॉ.टीजी सीथाराम, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इक्बाल सिंग लालपुरा, तसेच पुण्याचे सीजीएसटी ऑडिट 1,कमिश्नरेट अतिरिक्त आयुक्त जस्मीत सिंग धांद्रा आणि कौशल्य विकास,रोजगार आणि उद्योजकता आयुक्त आणि महाराष्ट्र स्टेट स्कील डेव्हलपमेंट विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, भोर विधानसभा मतदार संघाचे आमदार शंकर मांडेकर,महाराष्ट्र सरकारच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी.वेणूगोपाळ रेड्डी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ.पराग काळकर आदी मान्यवर उपस्थित होते. पीआयबीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटसचे अध्यक्ष रमणप्रीत सिंग यांनी स्वागतपर भाषण केले. या दोन दिवसीय परिषदेत 2000 हून अधिक प्रतिनिधी आणि 160 हून अधिक एमएसएमई प्रदर्शकांची उपस्थिती होती. यामध्ये,तरूण नवोन्मेषक आणि उद्योजकांसाठी विविध उपक्रमांचा समावेश होता. यामध्ये मार्गदर्शन सत्रे,अभिनवता आणि व्यवसाय विस्ताराला प्रोत्साहन देण्यासाठी एमएसएमई प्रदर्शन,उद्योगातील नेतृत्व,धोरणकर्ते यांच्यासोबत संवाद त्याचबरोबर भांडवल,ऑटोमेशन सोल्युशन्स,आयपीओ सहाय्य आणि गुंतवणूकदारांशी संपर्क साधण्याच्या उद्देशाने आयोजित विशेष सत्रांचा समावेश होता. याशिवाय इच्छुक तरूणांना एमएसएमई क्षेत्रांशी जोडण्यासाठी व रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी एक विशेष टॅलेंट मॅचमेकिंग डेक देखील स्थापित करण्यात आला होता.

# टर्टल वॅक्सने महाराष्ट्रातील पुणे येथे चौथ्या कार केअर स्टुडिओचे केले उद्‌घाटन

## अत्याधुनिक, वापरण्यास सोपी असलेली टर्टल वॅक्स® उत्पादनांसह मिळणार विशेष डिटेलिंग सेवा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिकागोस्थित, अवॉर्ड विनिंग कार केअर कंपनी असलेल्या टर्टल वॅक्स इनकॉर्पोरेशनने आज महाराष्ट्रातील पुणे येथे त्यांच्या चौथ्या को-ब्रँडेड कार केअर स्टुडिओचे उद्‌घाटन केले आहे. हा स्टुडिओ जांभुळकर अव्हेन्यू, हिंजवडी येथील कार आर्टसोबत भागीदारी करत सुरु करण्यात आला आहे. अत्याधुनिक टर्टल वॅक्स® डिटेलिंग टेक्नॉलॉजी व उच्च प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या टीमसह सुसज्ज असलेला हा स्टुडिओ कारप्रेमींच्या वैयक्तिक आवडीनुसार डिझाइन केलेल्या कार डिटेलिंग सेवा आणि उत्पादनांची विस्तृत श्रेणी प्रदान करतो. या स्टुडिओचे उद्‌घाटन पिंपरी चिंचवड शहराचे भाजपा उपाध्यक्ष श्री. राम वाकडकर यांच्या हस्ते व इतर अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

कार आर्ट अनेक वर्षांचा कार केअर व डिटेलिंगचा अनुभव पुण्यात घेऊन आले आहे. टर्टल वॅक्सच्या डिटेलिंग इनोव्हेशन आणि एक्सपर्टीजसह सर्वोत्तम दर्जाची गुणवत्ता व ग्राहक सेवेद्वारे उत्कृष्ट मूल्य प्रदान करण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेला हा स्टुडिओ प्रोफेशनल वेहिकल मेंटेनन्स व वेहिकल हायजिनसंबधी ग्राहकांच्या गरजा पूर्ण करतो. टर्टल वॅक्सच्या सिरॅमिक व ग्राफीन श्रेणीतील उत्पादनांसह लेटेस्ट टेक्नॉलॉजी वापरून हा स्टुडिओ कार केअरचे विविध पॅकेजेस सादर करतो, ज्यातून ग्राहकांना उत्कृष्टतेचा सर्वोच्च अनुभव मिळतो.

या कार केअर स्टुडिओमध्ये ग्राहकांना टर्टल वॅक्स®च्या जगप्रसिद्ध डिटेलिंग उत्पादनांचा अनुभव मिळेल, ज्यामध्ये कंपनीकडे पेटंट असलेली ग्राफीन टेक्नॉलॉजी वापरून बनविण्यात आलेले हायब्रीड सोल्युशन्स आणि हायब्रीड सोल्युशन्स प्रो यांचा समावेश आहे.

टर्टल वॅक्स कार केअर इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. साजन मुरली पुरवंगारा यांनी सांगितले, “महाराष्ट्रातून कार केअरविषयी वाढती आवड आम्ही अनुभवली आहे आणि म्हणूनच पुण्यात आणखी एक स्टुडिओ सुरु करण्याचा निर्णय घेतला. या नव्या स्टुडिओद्वारे आम्ही संपूर्ण राज्यात सर्वोत्तम दर्जाची कार डिटेलिंग सेवा पुरविण्याचा उद्देश ठेवतो. ब्रँडकडे उत्पादनांच्या सर्वात मोठ्या श्रेणीसह अद्वितीय डीआयएफएम सेवा आहेत. आम्हाला विश्वास आहे की कार आर्टसोबतची ही भागीदारी या भागातील ग्राहकांना उत्कृष्ट सेवा आणि फायदे देण्यासाठी मदत करेल. आमच्या डीलर नेटवर्कचा आम्हाला अभिमान आहे आणि आगामी काळात आम्ही ते आणखी मजबूत करून भारतातील टियर 2 व टियर 3 श्रेणीतील शहरांमध्येही पोहोचू.”

ग्राहक आता आपली कार रस्त्यावर काढण्यापूर्वी टर्टल वॅक्स कार केअर स्टुडिओमध्ये येऊन त्यांच्या कारला फ्रेश अँड क्लीन बनवू शकतात.

टर्टल वॅक्स® उत्पादने गाडीच्या मूळ रंगाला कोणतीही हानी न पोहचवता तापमानातील मोठे बदल, कारच्या एक्सटेरियरवरील स्क्रॅचेस, डलनेस आणि हवामानाच्या परिणामांपासून सुरक्षित ठेवतात. इंटेरियर क्लीनिंग देखील गाडी चालवताना आनंददायी अनुभव देण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे आणि टर्टल वॅक्स इंटेरियर डिटेलिंग कार केयर प्रॉडक्ट्सची विस्तृत श्रेणी प्रदान करतो.

या नवीन भागीदारीबद्दल बोलताना कार आर्टचे मालक श्री. विशाल अविनाश सूद म्हणाले, “कार आर्टमध्ये आम्ही इनोव्हेशनमधील उत्कृष्टता पुरविण्यासाठी काम करतो आणि ग्राहकांना आनंद देणे हे आमचे ध्येय आहे. कार केअरमधील ग्लोबल लीडर कंपनीसोबत भागीदारी करण्यास आणि त्यांचे प्रतिनिधित्व करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

आम्हाला विश्वास आहे की टर्टल वॅक्ससोबतची ही भागीदारी आमच्यासाठी नव्या उंची गाठणारी ठरेल आणि पुण्यातील कारप्रेमींना नक्कीच आवडेल.”

टर्टल वॅक्स कार केअर स्टुडिओ®मध्ये खालील सेवा उपलब्ध आहेत:

- स्मार्ट शिल्ड® पेंट प्रोटेक्शन फिल्म – ट्रान्सपरंट प्रोटेक्शन फिल्म जी गाडीच्या मूळ रंगाच्या संरक्षणासाठी खास तयार केली आहे.
- ग्रॅफिन कोटिंग – कारच्या रंगाला लॉन्ग लास्टिंग प्रोटेक्शन आणि हाय ग्लॉस शाईनसह टिकाऊ संरक्षण देणारी ग्राफीन कोटिंग
- सिरॅमिक कोट प्रोटेक्शन –स्टँडर्ड डिटेलिंग प्रोसेससह पेंट करेक्शन,प्री-क्लीन आणि सिरॅमिक कोट प्रोटेक्शन
- हायब्रीड सिरॅमिक कोटिंग – बेसिक एक्सटीरियर वॉश, रिन्स अँड ड्राय, पेंट करेक्शन, हायब्रिड सोल्युशन्स वॉश अँड वेट वॅक्स आणि हायब्रिड सोल्युशन्स सिरेमिक स्प्रे कोटिंग
- एक्सटीरियर रिस्टोरेशन ट्रीटमेंट – तीन प्रकार: स्मार्ट शिल्ड टेक्नोलॉजीसह पेंट करेक्शन, सुपर हार्ड-शेल शाइन, क्लीन अँड शाइन
- इंटिरियर डिटेलिंग ट्रीटमेंट – बेसिक इंटिरियर क्लीनिंग व कॉम्प्रिहेन्सिव्ह इंटिरियर क्लीनिंग: कार्पेट्स अँड अपहोल्स्ट्री, रूफ क्लीनिंग, प्लास्टिक्स अँड विनील, लेदर, एसी व्हेंट्स, एयर फ्रेशनर, ड्रेसिंग, रबर बीडिंग, डोर जाम्स, सीट बेल्ट्स, ग्लास
- स्पेशालिटी ट्रीटमेंट – कॉम्प्रिसिंग ऑडर ट्रीटमेंट, हेडलाइट रिस्टोरेशन, रेन-रेपलेंट कोटिंग, ट्रिम्स अँड क्रोम रिस्टोरेशन
- वॉश (45 मिनिटात) – क्लिनिंग, व्हॅक्युम, कॉकपिट क्लिनिंग, प्री-वॉश, रिन्स,अलॉय व्हील्स अँड टायर्स क्लिनिंग, फोम वॉश, स्प्रेड, रिन्स, ड्राय, ग्लास क्लीनिंग, टायर ड्रेसिंग

टर्टल वॅक्स® उत्पादने आमच्या टोल-फ्री नंबर – 1800 102 6155 आणि आमच्या ग्राहक सेवा टीमद्वारे customercareindia@turtlewax.com वर देखील खरेदी करता येतील.

रिटेलर/डिस्ट्रीब्यूटर होण्यासाठी किंवा ओईएम टाय-अपसाठी आमच्या टर्टल वॅक्स कॉर्पोरेट टीमशी संपर्क करा: indiatradeenquiry@turtlewax.com

भारतात लाँच होणाऱ्या टर्टल वॅक्स® उत्पादनांच्या संपूर्ण यादीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, www.turtlewax.in ला भेट द्या आणि फेसबुकवर @TurtleWax आणि इंस्टाग्रामवर @TurtleWaxIndia या सोशल मीडियावर टर्टल वॅक्सला फॉलो करा.

## थोडक्यात



### ५ चारचाकी गाड्यांचे वाटप

पुणे (आरंभ पर्व) : चाकण एमआयडीसीमध्ये स्थापित असलेल्या सुप्रसिद्ध अशा गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्ज इंडिया कंपनी आणि होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन च्या वतीने आपली समाजिक जबाबदारी लक्षात घेऊन महिला व बालकांची सुरक्षा आणि त्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी आरोग्य विभाग ,पुणे, ग्रामीण पोलीस आयुक्तालय कार्यालय व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय सरकारी विभागांसाठी ५ स्कोडा कायलॅक गाड्यांचे वाटप यावेळी फीत कापून तसेच हिरवा झेंडा दाखवून या गाड्या संबंधित विभागांकडे रवाना करण्यात आल्या. या कारवाटप कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून गेस्टॅम्पच्या आशिया विभागाचे सीईओ अँटोनियो लोपेझ उपस्थित होते. याशिवाय जिल्हा रुग्णालय, औंधचे सिव्हिल सर्जन डॉ. नागनाथ एस. यम्पल्ले, डॉ. अमित लवेकर, मानसोपचार तज्ज्ञ, सहायक सिव्हिल सर्जन, जिल्हा रुग्णालय, औंध. गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्जचे कंट्री सीईओ आणि अध्यक्ष ग्लिन जोन्स, कंट्री सीएफओ व प्रादेशिक वित्त संचालक अजय चौधरी, होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशनच्या सीईओ डॉ. कॅरोलिन ओडीअर दि वॉल्टर, भरोसा सेलच्या पोलिस उपनिरीक्षक अनुराधा पाटील आणि पोलीस निरीक्षक प्रवीण कांबळे म्हाळुंगे पोलीस स्टेशन यांच्यासह कंपनीचे इतर अधिकारी, तसेच पोलिस व आरोग्य खात्यातील अधिकारी उपस्थित होते. गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्सचे आशिया विभागाचे सीईओ अँटोनियो लोपेझ म्हणाले,"गेस्टॅम्पमध्ये आम्ही असा विश्वास ठेवतो की शाश्वत विकासाची सुरुवात समुदायांच्या सक्षमीकरणातून होते. होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशनसोबतच्या या भागीदारीद्वारे आम्ही केवळ वाहनेच देत नाही, तर प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानासाठी गुंतवणूक करत आहोत."या उपक्रमामुळे मोबिलिटी, आऊटरिच व आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेत वाढ होऊन, विशेषतः महिलांचे व बालकांचे आरोग्य व सुरक्षितता सुनिश्चित करण्यात मदत होईल आणि अधिक सुरक्षित, निरोगी समुदाय घडवता येईल. डॉ. कॅरोलिन ओडीअर दि वॉल्टर, सीईओ, होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन यांनी सांगितले,"हा उपक्रम हे सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे की आरोग्य व संरक्षण सेवा गरजूंना सहज उपलब्ध होतील.

## अध्यक्षपदी सागर अग्रवाल यांची निवड !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अग्रवाल समाजासाठी सामाजिक, धार्मिक तथा मनोरंजनाच्या क्षेत्रात सर्वोत्तम काम करणारी पुणेज ब्रदरहुड फाउंडेशन ही पुण्याची सर्वांत मोठी संस्था आहे. तुम्हा सर्वांना एका मजबूत परिवाराप्रमाणे काम करताना पाहून मी खरंच खूप प्रभावित झालो आहे. अग्रवाल समाजाचे कुलपिता अग्रसेन महाराजांच्या विचारांवर खऱ्या अर्थाने तुमच्या संस्थेची वाटचाल सुरू आहे आणि पुढेही असंच काम करीत रहा, असे आवाहन स्टरलाईट पॉवर कंपनीचे व्हाईस चेअरमन प्रवीण अग्रवाल यांनी केले. पुणेज ब्रदरहूड फाउंडेशनची नवीन कार्यकारिणी



नुकत्याच एका शानदार समारंभात स्थापित करण्यात आली. या वेळी प्रवीण अग्रवाल प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. समारोहाचे अध्यक्षस्थान सोमनाथ केडिया यांनी भूषविले. समारोहात मावळते अध्यक्ष पवन चमाडिया यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष सागर अग्रवाल यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे सुपूर्द केली.

## पहलगाम घटनेचा राजगुरूनगर मुस्लिम बांधवाकडून निषेध

**किरण खुडे**




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

पहलगाम येथे निरपराध पर्यटकांच्या हत्येच्या निषेधार्थ शहरातील मुस्लिम बांधवानी पाकिस्तान आणि दहशतवादाच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून जोरदार घोषणाबाजी केली. येथील दिलावरखान दर्ग्यासमोर हे आंदोलन करण्यात आले. पहलगाम घटनेत मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करून या आंदोलनाची सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाचा बीमोड करावा, त्याला आम्हा सर्व मुस्लिम बांधवांचा जाहीर पाठिंबा असल्याचे मनोगतात यावेळी वक्त्यांकडून सांगण्यात आले. राजगुरुनगरचे माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, रफिक मोमिन, समीर मोमिन, ॲड. इम्रान मोमिन, बाबा इनामदार, अबिद मोमिन, नौशाद तांबोळी, मोहसीन आतार, नाजीम इनामदार, सोयब आतार, अकिल शेख, शफीक मोमीन आदींनी निषेध मोर्चाचे आयोजन केले. आंदोलन सुरू असताना वाडा रस्त्यावर अनेक नागरिकांनी थांबून आंदोलकांची भाषणे ऐकली. या वेळी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## इलेक्ट्रिक स्कूटर कंपनी 'रिव्हर'ने पुणे येथे केले महाराष्ट्रातील पहिल्या स्टोरचे उदघाट्न

- **खराडीमधील रिलायन्स मॉलजवळ असलेलं हे स्टोर इंडी इलेक्ट्रिक स्कूटर, ॲक्सेसरीज़ आणि मर्चेंडाईज विक्री करणार आहे.**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इलेक्ट्रिक स्कूटर मॅनुफॅक्चरर कंपनी रिव्हरने महाराष्ट्रातील आपल्या पहिल्या स्टोरचे पुणे येथे उदघाटन केले आहे. हे स्टोर ब्रँडचा स्ट्रॉंगहोल्ड असलेल्या दक्षिण भारताबाहेरील त्यांचा पहिला उपक्रम आहे. 1300 स्क्वेअर फूटमध्ये पसरलेलं खराडी येथील रिव्हर स्टोर हे रलास व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहयोगाने सुरू करण्यात आलं आहे. रिव्हर स्टोरमध्ये ग्राहकांना इंडी, रिव्हरच्या सर्व ॲक्सेसरीज़ आणि मर्चेंडाईज अर्थात ब्रँडेड वस्तू यांचं प्रत्यक्ष प्रदर्शन पाहायला मिळेल. याशिवाय, या स्टोअरमध्ये एक पूर्ण संचालित सर्व्हिस सेंटर सुद्धा आहे, ज्याचं क्षेत्रफळ 4000 स्क्वेअर फूट असून स्टोरच्या 4 किमीच्या रेडियसच्या परिसरातच आहे.

स्टोरच्या उदघाटनप्रसंगी बोलताना रिव्हरचे को-फाउंडर आणि चीफ एक्सिक्युटीव्ह ऑफिसर अरविंद मनि म्हणाले, “पुणे हे बऱ्याच काळापासून ऑटोमोटिव्ह एक्सलेंसचे हब राहिले आहे. जेव्हा आम्ही इंडी लॉन्च केली, तेव्हा आम्हाला या शहरातून खूप प्री-ऑर्डर्स मिळाल्या आणि आता आम्ही स्कूटर्समधील स्पोर्ट युटिलिटी वेहिकल (एसयूव्ही) पुण्यात घेऊन येताना खूप उत्साही आहोत.

रिव्हर इंडीला या भागात एक खास वेगळे वेहिकल म्हणून प्रस्थापित करणे आमचं उद्दिष्ट आहे, जे स्टाईल आणि कन्विनियन्सला एकत्र आणतं. पुणे येथील स्टोर ही महाराष्ट्रातली आमची सुरुवात आहे आणि येणाऱ्या काही महिन्यांमध्ये आम्ही नाशिक, नागपूर, मुंबई आणि आणखी काही ठिकाणी स्टोअर्स उघडणार आहोत.”

पुण्यानंतर, रिव्हर पुढील सहा महिन्यांत महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये 10 नवीन स्टोअर्स सुरू करून आपली उपस्थिती वाढवण्याची योजना आखत आहे.. कंपनी दक्षिण भारततही विजयवाडा, त्रिसूर, पॉंडिचेरी आणि पलक्कड अशा ठिकाणी नवीन स्टोअर्स सुरू करत व्यवसाय विस्तार करणार आहे. रिव्हर सध्या वेगाने विस्तार करण्याच्या टप्प्यात आहे आणि यावर्षी पश्चिम, पूर्व आणि उत्तर भारतातील मार्केटमध्ये आपली उपस्थिती मजबूत करण्याचं त्यांचं नियोजन आहे. सध्या, कंपनी बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, हुबळी, विशाखापट्टणम, कोची, कोयंबतूर, मैसूर, तिरुपती आणि इतर ठिकाणी 20 स्टोअर्स ऑपरेट करत आहे.

खराडीममधील रिव्हर स्टोरमध्ये ग्राहकांना व्हायब्रन्ट वातावरण अनुभवायला मिळणार आहे. ब्रँडची सौंदयदृष्टी दाखविण्यासाठी यात नदीच्या सारांशाची आठवण करून देणाऱ्या गोट्या आणि इतर सेंद्रिय आकारांचा समावेश करण्यात आला आहे ज्यातून इंडी कशी तुमच्या दैनंदिन जीवनात मिसळून जाते हे दाखविण्यात आले आहे. ही गोष्ट रिव्हरच्या तत्वज्ञानाशी जुळते- 'Taking People From where They Are To where They Want To Be'

इंडीची किंमत 1,44,499 (एक्स -शोरूम, पुणे) आहे. ग्राहक स्टोरला भेट देऊन टेस्ट राईड्स घेऊ शकतात. यासह ग्राहकांना स्टोरमधून ब्रँडेड वस्तूंची खरेदी करता येणार असून, इंडी स्कूटर बुक देखील करता येईल. ग्राहकांना www.rideriver.com या संकेतस्थळावरून सुद्धा टेस्ट राईड्स बुकिंग आणि ऑनलाईन खरेदी करता येईल.रिव्हर स्टोर, खराडीचा पत्ता शॉप नं. 2, गुडविल लँडमार्क अपार्टमेंट्स, सर्व्हे नं. 11, हिस्सा नं. 10, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014 हा आहे.

## विकास युगातील महाराष्ट्राच्या दिशांचा धांडोळा

- **'NDTV मराठी मंच' या सर्वस्पर्शी व्यासपीठची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत मूहुर्तमेढ**




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

NDTV मराठीने आपला पहिला वर्धापन दिन साजरा करतांना NDTV मराठी मंच - हा आयोजित केला होता. राजकीय नेते, धोरणकर्ते, उद्योजक आणि तज्ञांना महाराष्ट्राच्या विकासाच्या मार्गाचा आढावा घेण्यासाठी आणि एकत्रितपणे त्याच्या भविष्याची आखणी करण्यासाठी एकत्र आले. हा कार्यक्रम सरकार, प्रशासन, पायाभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरणीय आव्हाने, उद्योजकता आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयांवर संवाद साधण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ ठरला. महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीपूर्वी शेती कर्जमाफीची घोषणा केली, पण सरकार आल्यावर घोषणेच्या अंमलबजावणीबाबत सतत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या विषयावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “राज्यातील ६०-७० टक्के शेतकरी आर्थिक तणावाखाली आहेत. आम्ही राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी १२,००० रुपये मदत करतो. आम्ही त्यांना विविध प्रकारे विम्याद्वारे मदत करतो. जर आपण या सर्व गोष्टींचा विचार केला तर आम्ही शेतकऱ्यांना मदत करत आहोत”'नवा गाडी, नवं राज्य' या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या महाराष्ट्राच्या तीन नवनियुक्त मंत्र्यांनी त्यांच्या संबंधित विभागांमधील माहिती सांगितली आणि सध्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठीचे त्यांचे भविष्यातील प्लॅन जनतेसमोर सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातल्या दरे गावच्या दौऱ्याबद्दल याच सत्रात खुमासदार चर्चा झाली. सातरचे पालकमंत्री आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, की "श्री. शिंदे दरेगावला भेट देतात तेव्हा ते नाराज असतात असे म्हणणे चुकीचे आहे. हे मीडियानं तयार केलेलं कथानक आहे. आम्ही त्यांना नियमितपणे भेटतो आणि ते आमचे स्वागत करतात. जर ते खरोखरच नाराज असते तर अशा बैठका झाल्या नसत्या. एखाद्याच्या गावाला भेट देणे हे नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ नये." याव्यतिरिक्त, मंत्री मेघना बोर्डीकर यांनीही याच भावनेला दुजोरा दिला. मेघनाताई म्हणाल्या, "मी कधीही मतभेदाचे कोणतेही चिन्ह पाहिले नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील तणावाबद्दलच्या चर्चा मीडियामध्येच आहेत, प्रत्यक्षात नाहीत." एका उल्लेखनीय सत्रात प्रसिद्ध चित्रपट निर्माते ओम राऊत आणि ज्येष्ठ अभिनेत्री पल्लवी जोशी यांच्याशी संवाद साधण्यात आला. तान्हाजी: द अनसंग वॉरियर आणि आदिपुरुष सारख्या चित्रपटाद्वारे यशाचे किल्ले सर करणाऱ्या ओम राऊत यांनी त्यांच्या सर्जनशील प्रवासाचा आणि भारतीय चित्रपटसृष्टीवरील त्यांच्या दृष्टिकोनाचा पडद्यामागील आढावा घेतला. वो चोकरी आणि अलिकडच्या द काश्मीर फाइल्समधील भूमिकांसह अनेक दशके रुपेरी पडदा गाजवणाऱ्या जोशी यांनी एका समृद्ध अभिनेत्रीचा दृष्टिकोन चर्चेत आणला. आणखी एका विचारप्रवर्तक सत्रात, NDTV मराठी मंचने लोकप्रिय मराठी डिजिटल निर्मात्यांना व्यासपिठावरुन बोलतं केलं. रोहित मावळे, सिद्धेश लोकरे, सौरभ भोसले आणि गणेश वनारे. या प्रभावशाली कलाकारांनी त्यांचे वैयक्तिक प्रवास - चिकाटी, सर्जनशीलता आणि सामुदायिक सहभाग - शेअर केले. त्यांनी त्यांचे कंटेट केवळ मनोरंजनासाठीच नाही तर पारंपारिक खाद्यपदार्थांपासून ते स्थानिक सण आणि मूल्यांपर्यंत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धतेचे जतन आणि प्रचार करण्यासाठी कसे कामाचे आहेत. यावर भर दिला.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज .. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *

१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## थोडक्यात



### महाराष्ट्र दिनी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न!

खडकवासला (आरंभ पर्व) : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधू नांदेड सिटी येथे आरोग्य तपासणी , व रक्तांच्या तपासण्या करण्यात आल्या. यावेळी सोसायटीच्या अंतर्गत सुरक्षा रक्षक व नागरिक यांच्या तपासण्या करण्यात आल्या. यावेळी आसावरी सोसायटीचे चेअरमन रुपेश आबासाहेब घुले पाटील, सचिव गजानन पडळकर,हेमेंद्र जोशी,महेश बजाज, वर्धमान भालेराव,महेश कांबळे आकाश नाईकवाडे, व नागरिक उपस्थित होते. उमा रॉय मेड पॅथ लॅबरोटरिज यांच्या मार्फत अल्प दरात महाराष्ट्र दिनानिमित्त व कामगार दिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते.

### शाळेच्या इमारतीसाठी जागामालकांचा रस्ता बंद करण्याचा डाव



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : गावातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षणासाठी म्हणून शाळेसाठी आमच्या पूर्वजांनी जागा दिली. परंतु आज या शाळेच्या काही कारभाऱ्यांनी मात्र आता आमचे मार्गच बंद करायचा घाट घातला आहे. पूर्वापार असलेली आमची निवासी वसाहत आणि त्याला जाण्यायेण्याचा रस्ताच बंद झाला तर आम्ही राहायचे कसे ?आमच्या घरात, जागांमध्ये जायचे कसे? हा प्रश्न आहे. यासाठी संरक्षक भिंत व आमच्या वहीवाटीच्या रस्त्यात शाळेचे बांधकाम करू नये, अन्यथा आम्हाला उपोषण अथवा आत्मदहन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. असा इशारा पत्रकार परिषदेत दोंदे (ता. खेड ) येथील सुकाळे मंडळी (ब्राह्मणवाडा ) येथील शिवकुमार सुकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला. याविषयी बोलताना शिवकुमार सुकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, दोंदे येथे १९६२ पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळेला आमच्या पूर्वजांकडून जागा घेण्यात आली असे काही व्यक्तींचे मत आहे. परंतु याबाबतचे कोणतेही बक्षीसपत्र, संमतीपत्र, खरेदीखत केलेले नाही. आमचे पूर्वज अशिक्षीत असल्याचा गैरफायदा त्यावेळी घेण्यात आला. केवळ तोंडी बक्षीसपत्राद्वारे ही जागा दिली अशी तात्कालीन नोंद करून गावातील तात्कालीन प्रमुखांनी आमच्या जागा घेतल्या. या शाळेत पहिली ते सातवीचे वर्ग चालविले जात असून २२० विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे. सध्या दहा वर्ग खोल्या अस्तित्वातही आहेत. शाळेला आमचा विरोध नाही. तरीही संपूर्ण जागेलाच संरक्षक भिंत बांधून आत शाळेची नवीन इमारत बांधण्याची भूमिका सध्याच्या शालेय व्यवस्थापन मंडळाने घेतली आहे. याच जागेतून जाणे येण्यासाठी आमचा पूर्वापार वहिवाटीचा रस्ता आहे. शाळेची बांधकाम करायला इमारत बांधायला आमची कोणतीही हरकत नाही. परंतु त्याकरीता आमच्याच जागेतील आमचा रस्ता बंद करू नये. अशी आमची मागणी आहे.



### बिबट्याच्या हल्ल्यात गाईचा मृत्यू

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : पापळवाडी (ता. खेड) येथील बाळासाहेब विठोबा दरेकर यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या जनावरांपैकी बिबट्याने दीड वर्षाच्या गायीच्या कालवडीवर मध्यरात्री हल्ला करून ओढून नेले. कालवडीला गोठ्याच्या बाजूला नेऊन अर्ध्यापेक्षा जास्त भाग खाल्याने कालवड गाईचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून त्यांना वन विभागाकडून पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत मिळावी. अशी ग्रामस्थांची मागणी आहे. याआधी सुद्धा पापळवाडी येथे एका तरुणावर बिबट्याने हल्ला केला होता. त्यामध्ये तो तरुण गंभीर जखमी झाला होता. तसेच पापळवाडी फाटा या ठिकाणी धनगराच्या कळपातील घोडी बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडली होती. या परिसरामध्ये बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे तसेच संध्याकाळच्या वेळेला बिबट्या भर रस्त्यात मोकाटपणे फिरताना दिसत आहे. या भागात वनविभागाने लक्ष देऊन तात्काळ पिंजरे बसवण्याची मागणी जयसिंग दरेकर यांनी केलेली आहे.

# सूर्यानाथ पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या फलकाचे अनावरण



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

दिनांक ३०.११.२०२५ रोजी साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर, सायंकाळी अभिरुची मॉल जवळील महालक्ष्मी मंदिराच्या प्रांगणात पुण्यातील संस्कार चॅरिटेबल ट्रस्टसंचलित सूर्यनाथ पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या फलकाचे अनावरण व औपचारिक उद्घाटन खडकवासला नांदेड येथील समाज कार्यात अग्रेसर असलेले लोकप्रिय व्यक्तिमत्व श्री. रुपेशजी घुले पाटील व सौ. रश्मी घुले पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

श्री. रुपेशजी घुले पाटील यांनी या पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटला शुभेच्छा देताना गरजू विद्यार्थ्यांना या इन्स्टिट्यूटला प्रवेश घेण्यासाठी ही एक सुवर्णसंधी उमा रॉय यांनी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी या सूर्यानाथ पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टर उमा रॉय यांनी लोकांनासंबोधित करताना सांगितले की या इन्स्टिट्यूट मध्ये पॅरामेडिकल डिप्लोमाचे सर्व कोर्सेस अतिशय अल्पदरात उपलब्ध होणार आहेत.

गरीब व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गरजू विद्यार्थ्यांना वरील कोर्सेसला प्रवेश घ्यायचा असेल तर ही संस्था त्यांना विविध माध्यमातून आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न करेल ,तसेच फी हप्त्या मध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि कोर्सेस यशस्वी रीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पुण्यातील विविध हॉस्पिटल मध्ये प्लेसमेंटसाठी प्रयत्न ही करेल.

याप्रसंगी इन्स्टिट्यूटचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री हेमेंद्र जोशी यांनी ही आपल्या मनोगतात सूर्यानाथ पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट ही अल्पावधीत उत्कृष्ट संस्था होणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी नांदेड सिटी येथील श्री गिरीशजी वसेकर,श्री महेश बजाज, धायरी येथील Dr राजेंद्र भवाळकर, श्री संतोषजी कदम, केतन शिंदे,राजश्रीतला , माधवबाग येथील Dr अनुराधा देशपांडे,राहुल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री गिरीशजी वसेकर यांनी या इन्स्टिट्यूटला शुभेच्छा देताना,गरजू विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षण, हाताला काम आणि दवाखान्यातील रुग्णांना आराम देण्यासाठी सूर्यानाथ पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट नक्कीच भरारी घेईल अशी आकांक्षा व्यक्त केली.

यानंतर सर्वांनी श्री महालक्ष्मी मातेचे दर्शन घेऊन संकल्पपूर्ती साठी आशिर्वाद घेतले आणि सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री महालक्ष्मी मातेची आरती संपन्न झाली आणि नाश्ता व चहापानानंतर समारंभाची सांगता झाली.



## आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद !

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुद्धिस्ट सामाजिक संस्था सारोळे यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात चांगला प्रतिसाद मिळाला.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी सामाजिक उपक्रम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व समाजातील समाज घटकांनी एकत्रित येत रक्तदान ही काळाची गरज आहे हा संदेश दिला.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मण संकपाळ, माजी सरपंच बाळराजे गाटे, पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे, चंद्रकांत साबळे, विश्वनाथ साबळे,अजय साबळे, अभियंता सुनील साबळे,पत्रकार लक्ष्मण साबळे, प्रतीक शेरखाने, प्रकाश भैय्या गाटे, सुधाकर जाधव, रवी साबळे ,बापू माने, बापू साबळे, मसा साबळे यांच्यासह कार्यकर्ते व रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी सभापती लक्ष्मण संकपाळ यांनी मंडळाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले .यावेळी एकूण 57 रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या.

## घरमालकांविरोधात लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हेगारीला आला बसण्यासाठी भाडेकरूंची माहिती पोलीसांना सादर करणे बंधनकारक असताना ती न देणाऱ्या न घरमालकांविरोधात लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे .

पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ (३) प्रमाणे घरमालक यांनी भाडेकरु ठेवताना तसेच खाजगी मालक यांनी नोकर भरती करताना सुरक्षीतते बाबत दक्षता घेणे करीता ही माहिती पोलीसांना कळविणे बंधनकारक असल्याचे आदेश काढलेले असुन त्याबाबत पोलीस विभागातर्फे वेळोवेळी प्रसार माध्यमाव्दारे त्याची प्रसिध्दी करण्यात आली आहे.

लोणीकाळभोर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात भाडेकरु बाबत माहिती तसेच हद्दीमधील हॉटेल, लॉजेस व गर्दीच्या ठिकाणी भेटी देण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशाने पोलीस स्टेशन स्तरावर दोन पथके निर्माण करण्यात आली होती. भाडेकरुची माहिती घेणाऱ्या पथकास तीन घरमालक यांनी भाडेकरु ठेवल्यानंतरही त्याची माहिती पोलीसांना कळविली नसल्याची माहिती प्राप्त झाल्याने या पथकाने १) दिलीप रैजिनाथ तकीक, वय-३३, रा. सुतारपट्टी, गुजरवस्ती, कवडीपाट, कदमवाक वस्ती, हवेली, पुणे. २) सरोजा प्रताप जाधव, वय ४९ वर्षे, रा. लेन नं. ०४, गणराज पार्क, कवडीपाट, कदमवाक वस्ती, हवेली, पुणे. ३) शिवाजी सुदाम कांबळे, वय ६० वर्षे, रा. स्वामी विवेकानंदनगर राधाई मच्छि मार्केट जवळ, कदमवाकवस्ती, पुणे यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी ठेवलेल्या भाडेकरूंची माहिती पोलीसांना कळविली नसल्या बाबत सांगीतले आहे.

त्यावरुन त्यांचे विरुध्द लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे तीन गुन्हे दाखल करण्यात आले असुन तपास सुरु आहे.

ही कामगिरी पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०५, डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र पन्हाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकाळभोर पोलीस ठाणे पुणे शहर, पोलीस हवा. रवि आहेर, पोलीस हवा. रामदास मेमाणे, पोलीस हवा. प्रदिप क्षिरसागर, पोलीस हवा. केतन धेंडे, महिला पोलीस हवा. राणी खामकर , पोलीस अंमलदार प्रशांत नरसाळे, पोलीस अंमलदार अक्षय कटके यांच्या पथकाने केली आहे.

लोणीकाळभोर पोलीस ठाण्याच्या वतीने आवाहन करण्यात येते की, ज्या घरमालकानी भाडेकरु ठेवलेले आहेत. त्यांनी भाडेकरूंची माहिती तसेच खाजगी मालक यांनी नोकर भरती करताना सुरक्षीतते बाबत दक्षता घेणे करीता सदरची माहिती भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३(३) प्रमाणे पोलीसांना देणे बंधनकारक असल्याने सदरची माहिती सादर करावी.

## राज्य पुरस्कार प्राप्ती बद्दल ज्ञानदीप फाउंडेशन तर्फे सत्कार




**बापूसाहेब पोकळे यांच्या सौजन्याने सत्कार सोहळा संपन्न**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून ज्ञानदीप फाउंडेशन व धायरी ग्रामस्थ यांच्यावतीने महाराष्ट्र राज्य सरकारचे पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

धायरीचे युवा नेते बापूसाहेब पोकळे यांच्या सौजन्याने हा सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. एक मे रोजी सकाळी आठ वाजता पद्मावती मंदिर धायरी गाव येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र दिनाच्यानिम्मित ध्वजारोहण ही करण्यात आले.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल विराज परदेशी व विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार मिळाल्याबद्दल दिगंबर पोकळे, आयएएस पदी निवड झाल्याबद्दल शिवांश जागडे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्रीरंग चव्हाण, माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, गुलाबराव पोकळे ,गंगाधर भडावळे, पै. तुषार पोकळे, ॲड .राजेश मिंढे ॲड राजेंद्र भारूड, रामदास कुंभार ,दिलीप रायकर, मंगेश बनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## कचऱ्यातून फुलवले सुंदर व हिरवेगार टेरेस गार्डन

- **साई जनसेवा प्रतिष्ठान व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाचा संयुक्त उपक्रम**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओला कचरा, किचन वेस्ट आणि टाकाऊ भाजीपाला यातून पर्यावरणपूरक असे सुंदर व हिरवेगार टेरेस गार्डन कात्रज परिसरात फुलले आहे. कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या टेरेसवर साई जनसेवा प्रतिष्ठानच्या पुढाकारातून ८०० चौरस फूट जागेत फळे, फुले, भाज्या आणि शोभेच्या झाडांनी ही बाग फुलवण्यात आली आहे. या टेरेस गार्डनमध्ये शेवगा, कारले, संत्रा, पपई, कांचन, बहावा, चाफा, जास्वंद, सदाफुली, कर्दळी, तगर, गुलाब, बांबू, ऊस, शोभेची रोपे अशी फळझाडे, फुलझाडे आहेत. फळा-फुलांचा बहर आला असल्याने ही बाग अतिशय सुंदर दिसत आहे.

साई जनसेवा प्रतिष्ठान व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या संयुक्त उपक्रमातून साकारलेल्या या बागेचे उद्घाटन बुधवारी पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्या हस्ते झाले. प्रसंगी पुणे महानगरपालिकेचे उपयुक्त जयंत भोसेकर, क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त लक्ष्मण कादबाने, साई जनसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक सुरज लोखंडे, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा गीता मोहोरकर यांच्यासह पालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पृथ्वीराज बी. पी. म्हणाले, "टायर, ड्रम, विटा यांसारख्या टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून बनवलेली ही बाग खूपच सुंदर झाली आहे. फळे, फुले आणि भाजीपाला तयार होतानाच, स्वच्छ प्राणवायू निर्माण होत आहे. घरातला ओला कचरा या बागेत जिरवला जात आहे. त्यामुळे कचरा कमी होणार आहे. अधिकाधिक पुणेकरांनी याचे अनुकरण करावे. आपल्या परसबागेत, गच्चीवर अशी छोटी बाग फुलवावी आणि त्यात टाकाऊ वस्तू आणि ओला कचरा जिरवावा. फक्त सुका कचरा पालिकेकडे प्रक्रिया करण्यासाठी द्यावा. प्रत्येकाने यामध्ये पुढाकार घेतला आणि ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली तर कचऱ्याचे विकेंद्रीकरण होऊन शहर स्वच्छ राहण्यास मदत होईल. शिवाय अशा भागांमधून आरोग्यदायी, भाजीपाला फळे उपलब्ध होतील. जेणेकरून आपले आरोग्य चांगले राहील. असा पर्यावरण पूरक उपक्रम राबवण्यासाठी पुणे महानगरपालिका नेहमीच प्रोत्साहन देईल एवढ्या सुंदर उपक्रमासाठी साई जनसेवा प्रतिष्ठान व आमच्या क्षेत्रीय कार्यालयाचे अभिनंदन करतो."

गीता मोहोरकर म्हणाल्या, "महानगरपालिकेच्या सहकार्याने शहरातील सिंहगड रस्ता, धनकवडी-सहकारनगर आणि कोंढवा-येवलेवाडी येथील क्षेत्रीय कार्यालयाच्या टेरेसवर ओल्या कचऱ्यापासून बाग तयार करण्यात आली आहे. केवळ ओला कचरा जिरवून त्यात झाडे लावण्यात आली आहेत. दोनशे लिटरच्या १६० ड्रममध्ये ही झाडे लावण्यात आली असून, यामध्ये रोज ६०० ते ७०० किलो ओला कचरा जिरवला जात आहे. टाकाऊ ड्रमचा वापर करून त्यापासून बसण्यासाठी खुर्च्याही तयार करण्यात आल्या आहेत. यामुळे कमी जागेत, कमी वेळेत आणि कमी खर्चात ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन शक्य झाले आहे. नागरिकांनी आपल्या घरी, सोसायटीमध्ये अशा बागा फुलवल्या, शहरातील कचऱ्याची वाढती समस्या आटोक्यात येण्यास निश्चित मदत होईल."

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सिविक प्राईड ऑर्गनायझेशन तर्फे रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

## समाजभान आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक हिताच्या भावनेतून कार्य करणारी सिविक प्राईड ऑर्गनायझेशन ही संस्था नेहमीच समाजहितैषी उपक्रम राबवण्यात आघाडीवर असते.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाराष्ट्र दिन व कामगार दिन या निमित्ताने संस्थेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाला युवक-युवतींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन झाली, त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. अमोल वलेकर यांनी सिविक प्राईड ऑर्गनायझेशनच्या स्थापनेचा प्रेरणादायी इतिहास मांडला. त्यांनी संस्थेच्या कार्याची दिशा, सामाजिक उत्तरदायित्वाची जाण आणि कामगार, युवक, महिला आणि पर्यावरण रक्षणासाठी घेतलेली भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. ओमकार शेंडुरे सर, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी भूषवले. त्यांनी आपल्या भाषणात सिविक प्राईड संस्थेच्या समाजहिताच्या कार्याचे भरभरून कौतुक केले आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी ही संस्था कशी अग्रस्थानी आहे हे अधोरेखित करत संस्थेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला सिंहगड कॉलेज, लोणावळा येथील यांत्रिकी विभागाचे प्रमुख (HOD) नामदेव गावडे सर यांचीही विशेष उपस्थिती होती. त्यांनी संस्थेच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण करून देत, संस्थेच्या सातत्यपूर्ण सामाजिक योगदानाचे कौतुक केले.

या रक्तदान शिबिरात सहभाग घेतलेल्या सर्व रक्तदात्यांना सन्मानचिन्ह म्हणून प्रमाणपत्र तसेच पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा एक झाड भेट देण्यात आली. या उपक्रमातून सिविक प्राईड ऑर्गनायझेशनने केवळ आरोग्याची नाही तर पर्यावरण संवर्धनाचीही जबाबदारी स्वीकारल्याचे दाखवून दिले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या यशस्वी उपक्रमामध्ये सिविक प्राईड ऑर्गनायझेशनच्या सर्व सदस्यांनी आणि स्वयंसेवकांनी अतिशय उत्साहाने व निःस्वार्थ भावनेने सहभाग घेतला.

सिविक प्राईड ऑर्गनायझेशन ही संस्था केवळ उपक्रम राबवण्यातच नाही तर समाजात बदल घडवण्यात विश्वास ठेवते. त्यांच्या 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाल्याने या उपक्रमाने सर्वांच्या मनात आदराचे स्थान मिळाले.

यावेळी श्रीमती काशीबाई नवले रक्तपेढीचे डॉ. संजय पाटील यांनी रक्तदानाचे महत्त्व समजून सांगितले. यावेळी जनसंपर्क अधिकारी दत्ता जाधव, अरुणा सावले, रुपेशकुमार पाटकुलकर, शुभांगी पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.